RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक १२६(४)] शुक्रवार, सप्टेंबर ३०, २०२२/आश्विन ८, शके १९४४ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३६१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**ग्रामविकास विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट,
मुंबई ४०० ००१, दिनांक ३० सप्टेंबर, २०२२

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम,१९६२.**

क्रमांक जिपनि- २०२१/प्र.क्र.११७/पंरा-२.— ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने शासकीय अधिसूचना, ग्राम विकास विभाग क्रमांक-जिपनि-२०२१/प्र.क्र.११७/पंरा-२, दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ अन्वये राज्यातील जिल्हा परिषदांकरीता त्यांना सध्या लागू असलेल्या आरक्षणाच्या कालावधीच्या समाप्तीच्या दिवसाच्या लगतनंतरच्या दिवसापासून सुरु होणाऱ्या अडीच वर्षाच्या कालावधीकरीता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग (विमुक्त जाती व भटक्या जमातींसह) आणि महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती यातील महिलांसह) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या, राज्यातील जिल्हा परिषदांच्या अध्यक्षांच्या पदांची संख्या विनिर्दिष्ट केली आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम,१९६२ मधील नियम २ ब, २ क व २ ड यातील तरतुदींनुसार महाराष्ट्र शासन, याद्वारे, राज्यातील ठाणे, भंडारा आणि गोंदिया या जिल्हा परिषदांकरिता त्यांना सध्या लागू असलेल्या आरक्षणाच्या कालावधीच्या समाप्तीच्या दिवसाच्या लगतनंतरच्या दिवसापासून सुरु होणाऱ्या अडीच वर्षाच्या कालावधी तसेच पालघर, धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम, नागपूर या जिल्हा परिषदांच्या उर्वरित कालावधीकरीता तसेच उपरोक्त जिल्हा परिषद वगळून उर्वरित २५ जिल्हा परिषदा गठीत होवून लगतनंतरच्या दिवसापासून सुरु होणाऱ्या अडीच वर्षाच्या कालावधी पासून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग (विमुक्त जाती व भटक्या जमातींसह) आणि महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती यातील महिलांसह) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या, राज्यातील जिल्हा परिषदांच्या अध्यक्षांच्या पदांचे वाटप सोबतच्या अनुसूचीमध्ये दर्शविल्यानुसार करीत आहेः-

## अनुसूची

| अ.क्र. (१) | जिल्हा परिषदांचे नांव (२) | जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या आरक्षणाचा प्रवर्ग (३) |
|---|---|---|
| १ | ठाणे | सर्वसाधारण |
| २ | पालघर | अनुसूचित जमाती |
| ३ | रायगड | सर्वसाधारण |
| ४ | रत्नागिरी | नागरीकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| ५ | सिंधुदुर्ग | सर्वसाधारण |
| ६ | नाशिक | सर्वसाधारण (महिला) |
| ७ | धुळे | सर्वसाधारण (महिला) |
| ८ | जळगांव | सर्वसाधारण |
| ९ | अहमदनगर | अनुसूचित जमाती |
| १० | पुणे | सर्वसाधारण |
| ११ | सातारा | नागरीकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| १२ | सांगली | सर्वसाधारण (महिला) |
| १३ | सोलापूर | नागरीकांचा मागास प्रवर्ग |
| १४ | कोल्हापूर | सर्वसाधारण (महिला) |
| १५ | औरंगाबाद | सर्वसाधारण |
| १६ | जालना | नागरीकांचा मागास प्रवर्ग |
| १७ | बीड | अनुसूचित जाती |
| १८ | परभणी | अनुसूचित जाती |
| १९ | हिंगोली | सर्वसाधारण (महिला) |
| २० | नांदेड | नागरीकांचा मागास प्रवर्ग |
| २१ | उस्मानाबाद | सर्वसाधारण (महिला) |
| २२ | लातूर | सर्वसाधारण (महिला) |
| २३ | अमरावती | सर्वसाधारण (महिला) |
| २४ | अकोला | सर्वसाधारण (महिला) |
| २५ | वाशिम | सर्वसाधारण |
| २६ | बुलढाणा | सर्वसाधारण |
| २७ | यवतमाळ | सर्वसाधारण |
| २८ | नागपूर | अनुसूचित जमाती |

| अ.क्र. (१) | जिल्हा परिषदांचे नांव (२) | जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या आरक्षणाचा प्रवर्ग (३) |
|---|---|---|
| २९ | वर्धा | अनुसूचित जाती (महिला) |
| ३० | भंडारा | अनुसूचित जमाती (महिला) |
| ३१ | गोंदिया | नागरीकांचा मागास प्रवर्ग |
| ३२ | चंद्रपूर | अनुसूचित जाती (महिला) |
| ३३ | गडचिरोली | नागरीकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| ३४ | नंदुरबार | अनुसूचित जमाती (महिला) |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मनोज जाधव,**
शासनाचे उप सचिव.

## ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट,
मुंबई ४०० ००१, दिनांक ३० सप्टेंबर, २०२२

### अधिसूचना

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम,१९६२.**

क्रमांक जिपनि- २०२१/प्र.क्र.११७/पंरा-२.—महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ यांच्या नियम २ अ च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन, याद्वारे राज्यातील जिल्हा परिषदांकरीता त्यांना सध्या लागू असलेल्या आरक्षणाच्या कालावधीच्या समाप्तीच्या दिवसाच्या लगत नंतरच्या दिवसापासून सुरु होणाऱ्या अडीच वर्षाच्या कालावधीकरीता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग (विमुक्त जाती व भटक्या जमातींसह) आणि महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती यातील महिलांसह) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या, राज्यातील जिल्हा परिषदांच्या अध्यक्षांच्या पदांची संख्या सोबतच्या अनुसूचित दर्शविल्यानुसार विनिर्दिष्ट करीत आहे :-

### अनुसूची

| अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग | | सर्वसाधारण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | ब | अ | ब | अ | ब | अ | ब |
| अनुसूचित जातीसाठी राखून ठेवावयाच्या राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्षांच्या पदांची संख्या | अनुसूचित जाती (महिला) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्षांच्या पदांची संख्या | अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवावयाच्या राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्षांच्या पदांची संख्या | अनुसूचित जमाती (महिला) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्षांच्या पदांची संख्या | नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गासाठी (विमुक्त जाती व भटक्या जमातीसह) राखून ठेवावयाच्या राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्षांच्या पदांची संख्या | नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्ग (महिला) यांच्यासाठी (विमुक्त जाती व भटक्या जमातीसह) राखून ठेवावयाच्या राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्षांच्या पदांची संख्या | सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखून ठेवावयाच्या राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्षांच्या पदांची संख्या | सर्वसाधारण प्रवर्गासतील (महिला) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्षांच्या पदांची संख्या |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| २ | २ | ३ | २ | ४ | ३ | ९ | ९ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मनोज जाधव,**
शासनाचे उप सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.